स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या

मानव्य विद्याशाखा अंतर्गत 'मराठी' विषयातील पीएच.डी (विद्यावाचस्पती) या पदव्युत्तर पदवीसाठी सादर करावयाचा

"डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियतकालिकांचा चिकित्सक अभ्यास"

या विषयावरील प्राथमिक संशोधन-आराखडा

संशोधक

बापूसाहेब खंडू जवळेकर

(एम. ए. बी एड. नेट)

मु.कासार जवळा, पोस्ट जवळा (बु)

ता. जि. लातूर

मार्गदर्शक

डॉ. संभाजी पाटील

(एम ए. सेट पीएच.डी)

प्राध्यापक तथा मराठी विभागप्रमुख

राजर्षी शाहू महाविद्यालय स्वायत्त, लातूर

संशोधन केंद्र

राजर्षी शाहू महाविद्यालय स्वायत्त, लातूर

प्रबंध शीर्षक: "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियतकालिकांचा चिकित्सक अभ्यास"

विषयाचे औचित्य:

२०व्या शतकाचा आरंभ हिंदुस्थानच्या समाजजीवनाला व राजकारणाला वेग आणि नवी दिशा देणारा होता. त्याला कारण भारतीय वर्तमानपत्रे राष्ट्रीय विचारांची होती. नियतकालिके ही एक फार मोठी सामाजिक शक्ती आहे. समाजमनावर आपल्या विचारांचे संस्कार हळूहळू पण ठामपणे रुजविण्याचे काम ही नियतकालिके करीत असतात. सातत्याने समाजमनावर भाषिक संस्कार, नैतिक, वैचारिक आणि वाङ्मयीन संस्कार रुजविणे आणि समाजमन घडविणे हे नियतकालिकांचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. लोकाभिरुची सोबत लोकमानस तयार करणे ही त्यांची फार मोठी जबाबदारी आहे. २०व्या शतकात मराठीत झालेल्या वाङ्मय व वैचारिक निर्मितीमध्ये नियतकालिकांचा फार मोठा वाटा आहे. नियतकालिके समाज प्रबोधनाचेही कार्य करीत असतात. म्हणून त्यांचा उल्लेख 'Fourth Estate of the Kingdom' असा केला जातो. भारतात ब्रिटिशांचे राज्य आले आणि त्यासोबतच त्यांच्या अनेक विद्या व शास्त्रे यांनी भारतीय समाजमनावर आपला प्रभाव टाकला. ज्ञान, विज्ञान, नवी विचारसरणी व उद्योगधंदे यांच्या रूपाने नवीन जीवनविषयक दृष्टी भारतीयांना आली. मराठी लेखनाला अक्षररूप देणारी आणि ते बहुजनांपर्यंत पोहोचविणारी मुद्रणकलाही त्यांच्यासोबत भारतात आली. तिच्यामुळे शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार झाला. समाज जागृतीस सुरुवात झाली. लोकांची लेखन आणि वाचनाची आवड वाढली. या आवड आणि गरजेतूनच नियतकालिकांच्या निर्मितीस प्रोत्साहन मिळाले. ही नियतकालिके जनजागृतीसाठी खूप आवश्यक होती. वर्ण व्यवस्थेने शूद्र ठरवलेला घटक याच मातीतला पण धर्म व्यवस्थेने त्याचे माणूसपणच नाकारले. त्याला बहिष्कृत केले. अस्पृश्य ठरवले गेले. अस्पृश्यता ही समाज जीवनाला आणि मानवतेला कलंकित करणारी एक जीवघेणी, सनातन सामाजिक समस्या आहे. ती समाजापुढे मांडण्यासाठी आणि सोडविण्यासाठी अनेक दलित नियतकालिक यांचा जन्म झाला आहे.

'नियतकालिक' या शब्दाचा अर्थ ठराविक वेळी, नियमितपणे प्रसिद्ध होणारे पत्र' असा असला तरी दैनिकांचा त्यामध्ये समावेश होत नाही. अलीकडच्या काळात नियतकालिक वाङ्मय या प्रकाराची मराठी वाङ्मयाच्या इतिहासात दखल घेतली जात आहे. सन १८३२ ते आज तागायत मराठी भाषेत अनेक नियत कालिके निघाली. परंतु आर्थिक अडचण आणि सामाजिक पाठिंब्या अभावी बव्हंशी ती बंदही पडली. तर काही नियतकालिके मात्र येणाऱ्या सर्व अडचणीवर मात करीत अव्याहतपणे आपले कार्य निष्ठेने पार पाडीत आहेत. एखादी सामाजिक, राजकीय वा सांस्कृतिक संघटना त्यांची चळवळ यांची मुखपत्रे म्हणून कार्य करणारी ही नियतकालिके समाज प्रबोधनासोबतच त्या त्या विचार प्रवाहांची मराठी वाङ्मयामध्ये मोलाची भर घालीत असतात.

अभ्यासाची आवश्यकता:

सांस्कृतिक वर्चस्व ज्या वर्गाचे असते त्या वर्गाचा प्रभाव साहित्यादी कलाक्षेत्रांवर सतत असतो. ही सांस्कृतिक भांडवलशाही नव्याने ज्यांना जाग आली आहे त्या वर्गाचा, दलित, शोषित, बहिष्कृत, पीडितांचा आवाज मुक्त होऊ देत नाही. त्यामुळे दलित-शोषित-बहिष्कृतांना सांस्कृतिक भांडवलशाहीशी सतत संघर्ष करावा लागतो. 'आम्हाला आमचे प्रश्न, व्यथा मांडू द्या' ही सामाजिक प्रेरणा दलितांच्या नियतकालिक निर्मितीमागे आहे. त्याच आंतरिक प्रेरणेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'समता' 'जनता' आणि 'प्रबुद्ध भारत' अशी विविध नियतकालिके जन्माला घातली. एखाद्या प्रश्नावर लोकमत जागृत करणे, प्रक्षुब्ध करणे, लोकमताला वळण लावणे आणि लोकमताचा दबाव निर्माण करून लोकांचे प्रश्न धसास लावणे, राज्यकर्त्यांच्या धोरणांची चिकित्सक, तर्कशुद्ध आणि परखड मीमांसा करण्यासाठी वर्तमान पत्रासारखी अन्य भूमीच नाही. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'मूकनायक'च्या अग्रलेखात म्हणाले होते. त्यांचे विचार आजही तंतोतंत लागू पडतात. मुंबई इलाख्यांत निघत असलेल्या वृत्तपत्रांकडे पाहता असे लक्षात येते की, 'त्यातील बरीचशी पत्रे आपापल्या जातीच्या हिताचे रक्षण करण्यासाठी जन्मास आलेली आहेत. त्यांना इतर जातींच्या हिताची पर्वा नसते'. हे कटू सत्य आहे.

दलितांच्या जाणीव जागृतीशिवाय सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया गतिमान होणार नाही. याची तीव्र जाणीव बाबासाहेबांना होती. म्हणून मुक्यांचे नेतृत्व करण्यासाठी 'मूकनायक' हे वृत्तपत्र जन्मास आले. अस्पृश्य, बहिष्कृत, वंचित, दीन-दुबळयांना समता, बंधुता, स्वातंत्र्य आणि सामजिक न्याय मिळवून देण्याच्या उद्देशाने दलित नियतकालिके उदयास आली. दलितांचा स्वाभिमान आणि माणूसपण यांच्या जागृतीसोबत त्यांना सुसंस्कृत करून नैतिक मूल्यांची जाणीव करून द्यावी. समाजमनाची वैचारिक क्रांतीसाठी मनोभूमी तयार करावी, आदी उद्देशांसोबतच सामाजिक चळवळीबरोबर समाज प्रबोधनाचे कार्य हाती घेतलेल्या या नियतकालिकांनी वैचारिक वाङ्मयासोबतच ललित वाङ्मय प्रकाशित करण्यावर सतत भर दिला आहे.

स्वाभिमानाचा कणा ताठ ठेवण्यासाठी आपल्या दुर्गुणांचा नायनाट करणे आवश्यक असते. दलितांनी आपल्या गळ्यातील वतनदारी फेकून दिल्याशिवाय समाजाचा उद्धार होणार नाही, याची स्पष्ट जाणीव आपल्या समाज बांधवांना लेखणीच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी करून दिली. दलित उद्धाराचा आव आणणाऱ्या ढोंगी आणि सनातनी, परंपराभिमानी वृत्तीच्या लोकांचा खरा चेहरा समाजासमोर उघडा करण्याचे काम केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुढाकाराने आणि प्रेरणेने उदयास आलेल्या 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता', 'प्रबुद्ध भारत', 'समता', 'दलित सेवक', 'सोमवंशी मित्र', 'दलित बंधू', 'गरुड', 'पतित-पावन', 'दलित निनाद' या आणि यासारखी अशी अनेक नियतकालिकांनी वैचारिक वाङ्मया

सोबतच विविध विषय आणि आशय यांच्या कथा, कविता, कादंबरी, निबंध आणि स्फुटलेखन या ललित वाङमय प्रवाहांना मानाची जागा देऊन मराठी साहित्य सशक्त आणि समृद्ध करण्यात मोलाची कामगिरी पार पाडली आहे. साहित्य आणि समाज यांचा जवळचा संबंध असतो. लेखक हा समाजाचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. साहित्याचा समाजाच्या जडणघडणीवर प्रभाव आणि परिणाम होत असतो. तर समाज साहित्य निर्मितीसाठी आशयद्रव्य पुरविण्याची मोठी कामगिरी पार पाडतो. समाजमनाचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. म्हणून साहित्याला समाजाचा आरसा संबोधले जाते. याला कोणताही मानवी समाज अपवाद नाही. जीवनातील विविध प्रसंग आणि अनुभवातून मानवी जीवनाचे यथार्थ दर्शन घडविणे ही साहित्य निर्मितीमागची खरी भूमिका असते. दलितांच्या नियतकालिकांमध्ये ललित लेखनामागची नेमकी हीच भूमिका आहे. वर्णवर्चस्व, जातीव्यवस्था, अस्पृश्यता, वेठबिगारी, दास्य, सर्वक्षेत्री गुलामगिरी या सर्वांना नकार देऊन मानवी मूल्य, समता प्रस्थापित करणे या लेखनाच्या प्रमुख प्रेरणा होत.

अन्याय, अत्याचार, विषमता, कर्मकांड, मानसिक आणि सामाजिक गुलामगिरी यांच्या विळख्यात अडकलेल्या दुःखित पीडितांची वेदना-व्यथा समाजासमोर मांडणे हा ललित लेखनामागील मुख्य उद्देश आहे. विविध प्रकारच्या आपत्ती आणि पेचात सापडलेल्या दलित अस्पृश्यांच्या व्यथा-वेदनांचे चित्रण हा या लेखनाचा हेतू नव्हे तर ते त्याचे बलस्थान आहे. गावकुसाबाहेर राहणाऱ्या अस्पृश्यांवर सवर्णांनी लादलेली बंधने. त्यामुळे आलेली मानसिक, आर्थिक, धार्मिक आणि सामाजिक गुलामगिरी, दारिद्रयामुळे दाबता न येणारी भूक व त्या पोटी पत्करावी लागणारी लाचारी. उफाळून येणारा स्वाभिमान आणि परिस्थितीपुढे स्वीकारावी लागणारी शरणागती असे दलितांच्या दुःखद अनुभवांचे विविध स्तर, अनेक रूपे दलित नियतकालिकांमधील ललित लेखनाच्या माध्यमातून मला तपासून पाहायची आहेत.

प्रकरण १ ले

"डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची समाज सुधारक चळवळ आणि नियतकालिकांची गरज"

१९ व्या शतकातील मराठी वृत्तपत्रे मग ती सामाजिक ध्येयाची असो की राजकीय, ती एका विशिष्ट विचाराने प्रेरित असलेल्या वर्गाची मक्तेदारी होती. त्यांनी स्वकियां व्यतिरिक्त अन्य बहुजन समाजाच्या प्रश्नांकडे व्यापकतेने पाहिल्याचे दिसत नाही. म्हणूनच सामाजिक प्रश्नांचे हे रण प्रामुख्याने पांढरपेशा पुरतेच मर्यादित राहिले. बहुजन समाज आणि त्या पलीकडे असणारा दलित वर्ग यांच्या सामाजिक व अन्य प्रश्नांची जाणीव फारशी निर्माण झाल्याचे दिसत नाही. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रसृष्टीला मोठे योगदान असूनही त्यांचा पत्रकार म्हणून प्रस्थापित मराठी वृत्तपत्रे विचार करताना दिसत नाही. मराठी

वृत्तपत्रसृष्टी टिळक- आगरकर, केळकर, कोल्हटकर, खाडिलकर यांच्या पुढे फारशी जाताना दिसत नाही. काहींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा निर्देश केला पण तो अतिशय त्रोटक, जुजबी असा सारा प्रकार आहे. आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे जे ग्रंथ प्रकाशित झाले त्यातही मराठीतील अनेक अज्ञात व्यक्तीचे निर्देश आहेत. पण बाबासाहेबांच्या वृत्तपत्रसृष्टीचा विचार नाही. प्र. न. जोशी यांनी ‘मराठी वाङ्मयाचा विवेचेक इतिहास’ यात केवळ एका ओळीतच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची बोळवण केली आहे. वृत्तपत्र आणि मराठी नियतकालिकांचा इतिहास लिहिणारे आणि मिमांसा करणाऱ्यांनीही बाबासाहेबांच्या वृत्तपत्र कर्तृत्वाकडे मुद्दाम, जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले दिसते. श्री.रा.के. लेले यांनी ‘मराठी वृत्तपत्रांचा इतिहास’ या ग्रंथात दखल घेतली पण ती बाबासाहेबांच्या वृत्तपत्रीय कर्तृत्वासंबंधित लेखन प्रकाशित झाल्या नंतरच. इतकेच नव्हे तर बाबासाहेबांशी काही काळ संबंध आलेल्या त्यांच्या मुलाखती घेतलेल्या त्र्य. वि. पर्वते यांनी ‘खबर’, ‘जयहिंद’ यासारख्या वृत्तपत्रांचा व ‘तेज’ या एकपानी दैनिकाचा उल्लेख केला. पण ‘मूकनायक’, ‘बहिष्कृत भारत’, ‘समता’, ‘जनता’ यासारख्या लोकशिक्षणाची व लोकजागृतीची बांधिलकी स्वीकारणाऱ्या नियत कालिकांची मराठी वृत्तपत्रांनी दखल घेतली नाही. त्यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रमाणे त्यांच्या वृत्तपत्रांना अस्पृश्यच ठेवले ही विचार करण्यासारखी बाब आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारधन अखिल मानव जातीसाठी उपयुक्त असून अभ्यासकांना आणि सुऱ्हदय संशोधकांना नवनवे दर्शन घडविते. याच दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पैलूंचा शोध घेण्याचा प्रयत्न या पहिल्या प्रकरणात करावयाचा आहे.

प्रकरण २ रे

मराठी नियतकालिकांचे स्वरूप, बाबासाहेबांचा दृष्टिकोन आणि समाज प्रबोधनात्मक नियतकालिके

वृत्तपत्रे ही आधुनिक विकासाचे आणि लोकशाहीचे प्रभावी माध्यम आहे. प्रबोधन हे आधुनिक युगाचे मानचिन्ह होय. ते ब्रिटिशांसोबत भारतात आले आणि या देशात विचार मंथनाला प्रचंड वेगाने सुरुवात झाली. त्यामुळे भारतीय समाजजीवन ढवळून निघाले. नवीन जडण-घडण होऊ लागली. समाजाची नव्याने बांधणी होऊ लागली. मानवी प्रतिष्ठा, व्यक्ति स्वातंत्र्य, दास्य मुक्ती, लोकशाही तत्वे अशा मानवी मूल्यांची जाणीव रुजू लागली. ब्रिटिश सत्तेच्या आगमनामुळे येथील समाजजीवन घुसळून निघाले. आपल्या इतिहासाकडे, समाज व्यवस्थेकडे नव्याने पाहण्याची दृष्टी त्यातून उदयास आली. श्रद्धा, पंपरा यांना प्रचंड हादरे बसू लागले. ब्रिटिश सत्तेचे आगमन म्हणजे नव परिवर्तनाचे, प्रबोधनाचे युग मानले जाऊ लागले. निद्रिस्त समाज जागा होऊ लागला. नव्या जाणिवेचे तो शिक्षण घेऊ लागला. त्यामुळे तो बोलू लागला. लिहू लागला. परिणामी पारंपारिक

शिक्षण पद्धतीला छेद जाऊ लागला. नव सामर्थ्याची जाणीव होऊन एकूणच मानवी जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी आली. खऱ्या अर्थाने हिंदुस्थान भारतात परिवर्तित होऊ लागला.

या नव प्रबोधनाला नाकारणारी, तिला विरोध करणारी एक प्रचंड परंपराभिमानी, सनातनी शक्ति कार्यरत होती. आपल्या रूढी, परंपरा, श्रद्धा, संस्काराचे जतन झाले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. आधुनिक भारताचे स्वप्न पाहण्यात जसे समाज सुधारक, विचारवंत अग्रेसर होते तसे वर्तमानपत्रेही जोमाने पुढे आली. वृत्तपत्रे ही मानवी जीवनाला सक्रिय ठेवणारी एका परीने ज्ञानपीठेच होय. लोकशिक्षण आणि लोकसेवा ही वृत्तपत्रांची मूलभूत प्रेरणा असून ती समाजसुधारणेचे, जनमताला चेतविण्याचे प्रभावी कार्य करतात. समाज व्यवस्थेतील स्थितीगतीवर, दोषांवर बोट ठेवून समाजाला वळण लावण्याची जबाबदारी ती अप्रिय असली तरी समाजहितासाठी वृत्तपत्रे निष्ठेने पार पडतात. तर काही वेळेस वृत्तपत्रे ही ‘स्व’बांधव व ‘स्व’समाजहीत पाहणारी असल्याने सामाजिक बांधिलकीपासून दूर जाणारी असे हे वृत्तपत्राचे वेगळे रूपही आपणास पहावयास मिळते. या दृष्टिकोनातून नियतकालिकांचा दुसऱ्या प्रकरणात विचार करावयाचा आहे.

प्रकरण ३ रे

संपादक डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांची नियतकालिके

१) मूकनायक २) बहिष्कृत भारत ३) समता ४) जनता ५) प्रबुद्ध भारत यांच्या अनुषंगाने

पारतंत्र्य, गुलामगिरी मग ती राजकीय असो सामाजिक असो की धार्मिक ती मानवी मूल्यांना नाकारणारी असते. याची जाणीव करून देणे ही काळाची गरज आहे. ती जाणीव निर्भयपणे करून देण्याचे काम वृत्तपत्रे करीत असतात. अंधाऱ्या रात्री कंदिलाचे जे काम तेच काम वृत्तपत्रांकडून होणे अपेक्षित असते. महाराष्ट्रात वृत्तपत्रांची सुरुवात सन १८३२ पासून झाली. तेव्हापासून अंधारात प्रकाश दाखविण्याचे काम वृत्तपत्रांनी सुरू ठेवले आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा उदय १९२०च्या सुमारास झाला. या कालखंडात जागतिक पातळीवर कितीतरी घटना घडलेल्या दिसतात. त्या सर्वांचे साद-पडसाद भारतीय समाजजीवन आणि वृत्तपत्र सृष्टीवर पडलेले दिसतात.

२० व्या शतकाने भारतीय समाजजीवन ढवळून काढले. राजकारणाला नवी दिशा मिळून वेग आला. एक एकटया चळवळीचे सामूहिक चळवळीत रूपांतर होऊन चळवळ अधिक गतिमान आणि प्रभावी झाली. राष्ट्रीय भान असलेल्या वृत्तपत्रांतून या सर्व घटना प्रतिबिंबीत होत होत्या. त्या सोबतच सामाजिक सुधारणा आणि विचारांकडे उदासीनतेने व तुच्छतेने पाहण्याची सनातनी वृत्ती वाढीस लागली. एकूणच सामाजिक

सुधारणेचा प्रवास अवघड वाटांचा, प्रदीर्घ असतो याची जाणीव झाली. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वृत्तपत्र लेखनाने भारतीय समाजकारणाला नवे वळण आणि वेग दिला. बाबासाहेबांनी सुरुवातीचे लेखन हिंदुस्थानातील इंग्रजी पत्रातून केलेले आहे. त्यांच्या असे लक्षात आले की, अस्पृश्यांच्या व्यथा-वेदना, समस्या एक अस्पृश्यच जिव्हाळयाने, जबाबदारीने आणि प्रभावीपणे मांडू शकतो. अस्पृश्यांची कैफियत नीटपणे मांडली गेलीच नाही तर त्यांना कोणतेही हक्क मिळणे अवघड होईल. त्यासाठी त्यांची बाजू मांडणारे प्रभावी साधन असणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात त्यावेळी बरीच वृत्तपत्रे होती. पण ती अस्पृश्यांच्या प्रश्नांचा विचार न करणारी होती, असा बाबासाहेबांना अनुभव आला. वृत्तपत्रांशिवाय अस्पृश्यांचे भवितव्य घडविता येणे अशक्य आहे. या विचारातून हजारो वर्षांपासून मूक असलेल्या समाजाला बोलते करणे, साक्षर होत असलेल्या समाजाला लिहिते करण्याच्या गरजेतून ३१ जानेवारी १९२० रोजी ‘मूकनायक’ पाक्षिक पत्राचा जन्म झाला.

सर्व मानव जातीचे कल्याण होईल अशी सर्वसमावेशक भूमिका वृत्तपत्रांनी घ्यावी. तशी भूमिका घेतली नाही तर त्यात सर्वांचेच अहित असल्याचा इशारा बाबासाहेब देतात. संपादक (पत्रकारिता) हा फक्त पैसे कमविण्याचा धंदा नसून लोकजागृतीसाठी घेतलेली स्वयं दीक्षा आहे. या अविचल निष्ठेने बाबासाहेब आपल्या वृत्तपत्रांच्या संपादकपदाची धुरा खंबीरपणे सांभाळताना दिसतात. ‘मूकनायक’ ते ‘प्रबुद्ध भारत’ हा प्रवास म्हणजे बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय जीवनाचा प्रवास असल्याचे त्यांच्या वृत्तपत्रीय लेखनातून जाणवते. त्या अनुषंगाने मला तिसऱ्या प्रकरणात विचार करावयाचा आहे.

प्रकरण ४ थे

दलित नियतकालिकातील साहित्याचे स्वरूप, प्रेरणा आणि वेगळेपण

शिक्षण माणसाला विचार देते. विवेक शक्ती जागी करते. त्याच्या बुद्धीची जोपासना करते. व सह अस्तित्वाची जाणीव करून देते. ही सहअस्तित्वाची जाणीव मानवी जीवनातील मूलभूत जाणीव आहे. शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ‘उपासमारीने माणूस दुबळा व अल्पायुषी होतो. तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध होऊन जिवंतपणीच दुसऱ्याचा गुलाम बनतो. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे प्रमुख साधन मानले आहे.

शिक्षण सर्व स्तरांपर्यंत पोहोचत गेले. शिक्षणामुळे माणूस सजग झाला. तो ऐकू लागला. पाहू लागला. आणि लेखणीच्या माध्यमातून अंतःकरणातील सामाजिक व्यथा-वेदना तो समाजासमोर व्यक्त करु लागला. त्याला व्यक्त होण्यासाठी नियतकालिकांनी एक हक्काचे, व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून दिले. दलित, बहिष्कृत माणूस आपले प्रश्न, वेदना, नकार, विद्रोह हे कथा, कविता, कादंबरी, नाटक, स्फुटलेख अशा विविध माध्यमातून व्यक्त करू लागला. या सर्वांचा विचार मला या चौथ्या प्रकरणात करावयाचा आहे.

प्रकरण ५ वे

नियतकालिकातून प्रसिद्ध झालेल्या साहित्याचे भाषिक आणि वाङ्मयीन अंगाने वर्गीकरण

भाषा हे संवादाचे प्रभावी माध्यम आहे. लेखकाचे सामर्थ्य म्हणजे त्याची भाषा होय. जनमताला आवाहन आणि आव्हान करण्याची क्षमता या भाषेतच असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या कार्यतत्पर लेखकाची वृत्तपत्रीय भाषा ही लोकशिक्षणाचा वसा घेऊनच उभी राहिलेली आहे. त्यामुळे बाबासाहेबांची भाषा लोकमनाशी सरळ संवाद साधताना दिसते. बाबासाहेब आपले वृत्तपत्रीय लेखन इंग्रजी आणि मराठी भाषेत करताना दिसतात. लेखन विषय मग तो कोणताही असो या मनीचे त्या मनी संवाद साधताना त्या विषयाचे महत्व पटवून देणे, त्या विषयाला न्याय मिळवून देणे ही लेखक म्हणून त्याची नैतिक जबाबदारी असते. बाबासाहेबांचा मूळ पिंड विचारवंताचा आहे. त्यामुळे त्यांचे सर्व लेखन विचारप्रवर्तक असे आहे. त्यांची लेखणी एकाच वेळी दोन स्तरावर संवाद साधते. स्पृश्य आणि अस्पृश्यांशी मनीचे हितगुज करते. अस्पृश्यांना जागृत करते. तर स्पृश्यांना मानवतेचे, समतेचे रक्षण कर्तव्य भावनेने करण्याचे आवाहन करते. विचारांबरोबरच भावना आणि कर्तव्याची जाणीव करून देते. यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषेला दोन जगाचे भान असल्याचे दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन विचारगर्भ असल्याने त्यांच्या भाषेत अलंकारिकता किंवा कृत्रिम सजावट नाही. तर आंतरिक आशय सामर्थ्य व्यक्त करणारी त्यांची भाषा दिसते. बाबासाहेबांचे लेखन मनोरंजनाचे माध्यम म्हणून जन्माला आले नाही. तर अस्पृश्यांमध्ये अंतरिक जाणीव जागृत करणे, वैचारिक जाणीव निर्माण करण्यासाठी आले आहे. याची तीव्र जाणीव त्यांचे लेखन वाचताना होते. बाबासाहेबांच्या लेखनाचा ठळक विशेष म्हणजे अमोघ आणि मार्मिक युक्तिवाद होय. तसेच त्यांच्या लेखनात उपरोध आणि प्रशंसाही येते. निःसंदिग्धता, निश्चयात्मक्त, निर्भयता, परखड व स्पष्टवक्तेपणा आणि निर्धार हे अंगभूत गुण बाबासाहेबांच्या शब्दाशब्दांतून जाणवतात. लोकप्रबोधन हा बाबासाहेबांच्या भाषेचा आत्मा आहे. त्या अनुषंगाने पाचव्या प्रकरणात विचार करावयाचा आहे.

प्रकरण ६ वे

उपसंहार

२० वे शतक अनेक अर्थाने क्रांतिकारक शतक आहे. या शतकात घडलेल्या अनेक घटनांनी या शतकाची वेगळी ओळख निर्माण केली आहे. आधुनिक महाराष्ट्रात सामाजिक प्रबोधनाच्या आंदोलनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. अनेक समाजसुधारक, विचारवंत, हितचिंतक यांनी समाज जीवनात अमुलाग्र परिवर्तनासाठी आपले आयुष्य पणाला लावले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर निष्ठावान, क्रांतिकारी व क्रियाशील, वास्तववादी विचारवंत होते. सतत देशस्थितीचा बाबासाहेब विचार करताना दिसतात. अस्पृश्यांना विचार जागृत आणि आत्मपरीक्षण करण्यासाठी त्यांनी वृत्तपत्राचे प्रभावी माध्यम हाताशी घेतले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या मूकनायकाने, बहिष्कृत भारतातील समाजाला प्रबुद्ध भारताची दीक्षा दिली. एक मन्वंतर घडले. एक नवे परिवर्तनशील जग जन्माला आले. अशा विविध अंग-उपअंगांचा विचार वरील पाच प्रकरणांच्या आधारे उपसंहार या सहाव्या प्रकरणात मला करावयाचा आहे.

टीप: अभ्यासाअंती संशोधन आराखड्यात बदल संभवनीय आहेत.

मार्गदर्शक — संशोधक

डॉ. संभाजी पाटील — श्री. बापूसाहेब जवळेकर

अभ्यासाची साधने:

१) कानडे रा.गो. : मराठी नियतकालिकांचा इतिहास कर्नाटक पब्लिशिंग हाऊस, मुंबई १९३८

२) केळकर न. चि. : वृत्तपत्र मीमांसा निळकंठ प्रकाशन, पुणे १९६५

३) जोग रा. श्री. (सं) : मराठी वृत्तपत्रांचा इतिहास खंड ४ व ५ म.सा.प. पुणे, १९६५ व ७१

४) आडसुळ भाऊसाहेब : बाबासाहेब आंबेडकर प्रेरणेचे साहित्य, बौद्ध साहित्य परिषद, मुंबई, १८, १९७७

५) कीर धनंजय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६६

६) पानतावणे गंगाधर : पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अभिजित प्रकाशन, नागपूर १९८७

७) निर्मळे हरिश्चंद्र : दलितांची नियतकालिके, सुगावा प्रकाशन, पुणे १९८७

८) पानतावणे गंगाधर : विद्रोहाचे पाणी पेटले आहे, विजय प्रकाशन, नागपूर १९७८

९) पाटील शरद : दास शूद्रांची गुलामगिरी, प्रज्ञा प्रकाशन, वाई १९८२

१०) देशपांडे अ. ना. : आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १, व्हीनस प्रकाशन, पुणे १९५४

११) जोशी लेले : वृत्तपत्रांचा इतिहास, युगवाणी प्रकाशन, मुंबई १९५१

१२) खरात शंकरराव : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रे, श्रीलेखन वाचन भांडार, पुणे १९६१

१३) देशमुख उषा मा.(सं) : मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास, खंड २ व ३ मुंबई विद्यापीठ, मराठी विभाग, रोप्य महोत्सवी प्रकाशन व स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे १९९४ व ९५

१४) बेडेकर व भणगे (सं) : भारतीय प्रबोधन : समीक्षण व चिकित्सा, समाज प्रबोधन संस्था, पुणे १९७३

१५) शिंदे वि. रा. : भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न

१६) आणि नियतकालिके :